दै. गोदातीर दि. 01.03.25

# नांदेड पोलिसांची जुगार अड्ड्यांवर कारवाई; कंधार, मुखेड, भाग्यनगर ठाण्यात गुन्हे दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील भाग्यनगर, मुखेड आणि कंधार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर आणि मटका बुक्क्यांवर पोलिसांनी कारवाया करून अनेकांना अटक केली आहे.

नांदेड शहरातील सन्मित्र कॉलनी बॉबी बारच्या बाजूला मटका बुक्कीवर पोलिसांनी २६ फेब्रुवारी रोजी कारवाई केली. यावेळी तिघांना अटक करून जुगाराचे साहित्य असा ८ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या घटनेत कंधार शहरातील बहादरपुरा येथील लॉ कॉलेजच्या पाठीमागे पाच जणांना अटक करून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा दोन लाख ५ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर तिसऱ्या कारवाईत दाबका राजा शिवारात सहा जुगाऱ्यांकडून नगदी व दुकानाचे साहित्य असा ४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या सर्वांवर त्या, त्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दै. गोदातीर दि. 01.03.25

# अवैध पिस्तूल विक्री करणाऱ्या दोघांना अटक; तीन पिस्तूल आणि सात जिवंत काडतुस जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील हिंगोली गेट भागातील फटाका मैदानावर विनापरवाना पिस्तुल विक्रीसाठी आलेल्या दोन जणांना वजिराबाद पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्तूल आणि सात जिवंत काडतुस असा १ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

नांदेड शहरात पिस्तूल विक्री करणारे काही गुन्हेगार सक्रीय आहेत. अशा गुन्हेगारांकडे पोलिसांनी आपला मोर्चा वळविला असून त्यांच्यावर कारवाईचे सत्र सुरु केले आहे. शुक्रवारी शहरातील फटाका मैदानावर दोन युवक पिस्तुल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती वजिराबाद पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांना मिळाली. त्यांनी सदरची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक सुशीलकुमार नायक यांना सांगून आपले पथक रवाना केले. पथकासोबत स्वतः पोलीस निरीक्षक कदम व कर्मचाऱ्यांनी गुरुवारी सायंकाळी सापळा रचून पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या रोहित नरेंद्र ताटीपामुलवार (वय २०), रा.अंबड ह.मु. भावेशनगर चौफाळा, नांदेड व भागवत विष्णू डोंगरे (वय ३०) रा. बाजीठमर ता. जालना ह.मु. भावेशनगर, चौफाळा, नांदेड या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्तूल व सात जिवंत काडतुस जप्त केले. पोलीस हवालदार शिवसांब मठपती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात या दोन जणांविरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.